ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २६ मार्च, १९५८ अंक १३

## विविध माहिती

**सेवानिवृत्तांना महागाईभत्ता**—आसाम राज्य सरकारनें आपल्या राज्यांतील सेवानिवृत्त नोकरांना महागाईभत्ता देण्याचें ठरविलें आहे. राज्य सरकारच्या ज्या सेवानिवृत्त नोकरांना दरमहा ३०० अगर त्यापेक्षा कमी पेन्शन मिळत असेल त्यांना सरसहा १० रुपये महिना महागाईभत्ता देण्यांत येणार आहे. वाढत्या राहणीच्या खर्चामुळें पेन्शनर भत्त्याची मागणी करीत होते.

**खोल पाण्यांतील छायाचित्रें**—पॅसिफिक महासागरांत संशोधन करण्यासाठी एक रशिअन बोट फिरत असतांना बोटीवरील संशोधकांनीं समुद्राच्या पाण्यांत ५½ मैल खोलीवरील छायाचित्रें घेण्यांत यश मिळविलें आहे. इतक्या खोलीवर छायाचित्रें घेण्याचा हा उच्चांक असावा असें म्हणतात.

**व्यायामपटूंचा संघ**—येत्या मे-जूनमध्यें टोकिओ येथें आशिआंतील राष्ट्रांमधील खेळाडूंचा तिसरा मेळावा भरविण्यांत येणार आहे. त्यावेळीं भारतातर्फे १०० व्यायामपटूंचा एक संघ जपानला जाणार आहे. सांघिक खेळांपैकी हॉकी, फूटबॉल, व्हॉलीबॉल व बेसबॉल ह्या खेळांत भारत भाग घेणार आहे.

**कर्नाटकमधील गिरणी बंद**—हुबळी येथील न्यू कर्नाटक कॉटन मिल्सच्या चालकांनीं गिरणी बंद केली आहे. अबकारी कराबाबतचें सरकारी धोरण व यंत्रभागांना नाकारण्यांत आलेली परवानगी ह्या दोन कारणांमुळें गिरणी बंद करावी लागली, असें त्यांचें म्हणणें आहे.

**जपानची नवी विनाशिका**—जपाननें सुमारें ६४ लाख डॉलर्स खर्च करून एक नव्या प्रकारची विनाशिका बांधली आहे. तिचें वजन १,७०० टन आहे. समुद्रांत प्रवास करतांना अणुबॉंबचा स्फोट होऊन किरणोत्सर्गी धूलीकणांचा वर्षाव झाल्यास ह्या संसर्गापासून संरक्षण करण्याची खास व्यवस्था तीवर करण्यांत आली आहे.

**वनस्पति तुपावरील कर**—सौराष्ट्र ऑइल मिल्स असोसिएशननें विक्रीकर-चौकशी कमिटीला अशी सूचना केली आहे कीं, वनस्पति तुपावरील विक्रीकर रद्द करण्यांत यावा. त्याऐवजीं वनस्पति तुपावरील अबकारी कर वाढविता येण्यासारखा आहे, असें संघटनेचें मत आहे.

**पाकिस्तानचें राष्ट्रगीत बंगालींतहि**— पाकिस्तानच्या सध्याच्या राष्ट्रगीतांत पर्शिअन भाषेंतील शब्दांचा बराच भरणा आहे. त्यामुळें पूर्व बंगालमधील पाकिस्तानी नागरिकांना तें कळत नाहीं. पाकिस्तान सरकारनें आतां बंगाली भाषेंतहि राष्ट्रगीत तयार करण्याचें ठरविलें आहे.

**नेवासें येथें ज्ञानेश्वर मंदिर**—श्रीरामपूरपासून २० मैलांवर असलेल्या नेवासें ह्या गांवीं संत ज्ञानेश्वर महाराज ह्यांचें मंदिर बांधण्यांत येत आहे. ह्याच ठिकाणीं ज्ञानेश्वरी लिहिली गेली. मंदिराचें काम चालू झालें असून त्यास १,७५,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. मंदिरांत स्थापन करण्यांत येणारी ज्ञानेश्वरांची प्रतिमा जयपूर येथील कलाकाराकडून तयार करविण्यांत आली आहे.

**अणुशस्त्रांविरुद्ध मोहीम**—पश्चिम जर्मनींत अणुशस्त्राविरुद्ध मोहीम करण्यासाठीं निरनिराळ्या क्षेत्रांतील मोठ्या लोकांनीं तयारी चालविली आहे. जर्मन सैन्याला अणुशस्त्रें पुरविण्यांत येऊं नयेत आणि जर्मनींत अग्निबाणांचे तळ स्थापन करण्यांत येऊ नयेत असें त्यांचें म्हणणें आहे. नाझी राजवटीला विरोध करणारा कार्डिनल नीमोलर ह्यानें तर युद्धाचा प्रसंग ओढवल्यास जर्मन कामगारांनीं संप करावा असें सुचविलें आहे.

**गोव्यांतील मॅंगेनीझच्या खाणी**—जपाननें गोव्याकडून मॅंगेनीझच्या अशुद्ध मातीची आयात करण्याऐवजीं ती भारताकडून घेण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्णयामुळें गोव्यांतील खाणीमालकांना जपानकडून मिळणारी आर्थिक व तांत्रिक मदत बंद झाली आहे. त्यामुळें बऱ्याच मालकांनीं खाणी बंद करण्याचें ठरविलें आहे. बेकारी अर्थातच वाढत आहे.

**नासधूस थांबविण्याची मोहीम**—चीनच्या सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून नासधूस थांबविण्याची व अवास्तव खर्च कमी करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्याचप्रमाणें शहरांतील कारकुनी स्वरूपाचीं कामें करणाऱ्यांना शेतांत राबण्यास पाठविण्यास सुरवात केली आहे. गेल्या वर्षीं अशा रीतीनें सुमारें १३ लाख लोकांना सहकारी शेतांवर पाठविण्यांत आलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ साकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## तुमचें स्थान कोणतें ?

( लेखक व प्रकाशक : श्रीपाद वामन काळे, दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४. किंमत दोन रुपये. )

" आपल्या रोजच्या दैनंदिन व्यवहारांत विचार करून, दुसऱ्याची सोय पाहून, खरें म्हणजे आपल्यामुळें इतरांची गैरसोय होणार नाहीं याची दक्षता घेऊन, वागण्याची प्रवृत्ति फारच थोड्यांच्या अंगीं आढळते. मोठमोठ्या हुद्द्यांवर असलेलीं, व्यवहारांत कर्तबगार, यशस्वी म्हणून ठरलेलीं माणसें त्यांच्या निकटवर्तीयांना सुख देऊं शकत नाहींत हाहि अनेकांचा अनुभव आहे. मोठ्या माणसांना त्यांच्या उपद्रवी स्वभावाची कोणी जाणीव करून दिलीच, तर ते म्हणतात कीं या लहान सहान गोष्टी आहेत; त्यांत एवढें बारीक लक्ष तें काय द्यावयाचें ? पण लक्ष देऊन विचारपूर्वक वागण्याची संवय लागली कीं मग लहान आणि मोठी गोष्ट हा भेदच रहात नाहीं. विचारी माणूस सर्वच गोष्टींत सारासार विचारानें वावरूं लागतो. आपल्या नेहमींच्या वागणुकींत हा विवेक बाणण्यासाठी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत वावरणाऱ्या माणसांना त्यांच्या वागणुकींतील दोषस्थळें कोणीतरी आत्मीयतेनें दाखवून देणें जरूर असतें आणि नेमकें तेंच काम श्री. काळे यांनीं प्रस्तुत पुस्तकांत साधलें आहे.

" या पुस्तकांतील लेखांचें स्वरूप बोधपर स्वैर लघुनिबंध हें असून उद्यम, केसरी, किर्लोस्कर, चित्रमय जगत, इत्यादि नियतकालिकांतून ते प्रसिद्ध झाले होते. शाळा-कॉलेजांचे बक्षिससमारंभ, विवाह-प्रसंग, वाढदिवस, अशा समयीं भेट देण्यास योग्य असें हें पुस्तक आहे."

—धनुर्धारी
१–२–१९५८

### हिंदी फळांची निर्गत

१९५३–५४ मध्यें १०,३८,१८६ रु. किंमतीच्या फळांची निर्यात झाली. हा आंकडा १९५४–५५ मध्यें ११,३२,१८६ रु. वर, १९५५–५६ मध्यें १२,६०,२५० रु. वर आणि १९५६–५७ मध्यें १६,२९,९५४ रु. वर गेला.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

**फक्त सभासदांकरितां**

दिनांक २३–३–५८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या सभागृहांत बोलाविलेल्या बँकेच्या विशेष साधारण सभेची नोटीस ही नजरचुकीनें पोट-नियम दुरुस्तीसाठी लागणाऱ्या मुदतीपेक्षा कमी मुदतीची पाठविली गेल्याचें आढळून आल्यामुळें सदर दिनांक २३–३–५८ ची सभा त्या दिवशीं न भरतां ती रविवार दिनांक २७–४–५८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या सभागृहांत भरणार आहे. सबब दिनांक ७–३–५८ च्या नोटिशींतील विशेष साधारण सभेची तारीख २३–३–५८ ऐवजीं २७–४–५८ वाचावी.

सदर सभेंत होणारीं कामें हीं दिनांक ७–३–५८ च्या नोटिशींत नमूद आहेतच; त्यांचा विचार होईल. सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें शहर,
दिनांक १८–३–५८

मा. बोर्डाचे हुकुमावरून
वा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर

५०
वर्षापेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



# अर्थ

बुधवार, ता. २६ मार्च, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताला मदत देणें अमेरिकेच्याच हिताचें

अमेरिकेचे भारतामधील माजी वकील सिनेटर जॉन शेरमन कूपर ह्यांनीं न्यूयॉर्क टाइम्समध्यें एक लेख लिहून अमेरिकेनें भारताला दिली आहे त्यापेक्षाहि अधिक मदत देणें अमेरिकेच्याच हिताचें आहे असें प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात कीं, अमेरिकेनें भारताला जें २२.५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे, त्याचा भारताला चांगला उपयोग होईल ह्यांत शंका नाहीं; पण, त्याशिवाय दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या उरलेल्या कालावधींत अमेरिकेकडून आणखी ५० कोटी डॉलर्सचें कर्ज मिळणें अगत्याचें आहे. असें जादा कर्ज मिळण्यावर पंचवार्षिक कार्यक्रमाचें यशापयश अवलंबून आहे म्हणून आणखी मदत देण्याचें आश्वासन अमेरिकेनें दिलें पाहिजे.

सध्यां खुद्द अमेरिकेंतच आर्थिक मंदी आलेली आहे. त्याचबरोबर संरक्षणासाठीं अधिक खर्च करण्यांत यावा म्हणून इतर बाबींवरील खर्च कमी करण्याची भाषाहि बोलली जात आहे. अशा वेळीं भारताला आणखी मदत देण्याविरुद्ध सध्यां जोराची टीका करण्यांत येण्याचा संभव आहे. पण भारताची बाजू संपूर्णपणें मांडण्यांत आली तर अशी मदत देणें अमेरिकेच्याच हिताचें आहे ही गोष्ट पटवून देतां येईल. भारतानें आपल्या मोठ्या लोकसंख्येचें जीवनमान सुधारण्याचे प्रयत्न चालविले आहेत. हा प्रश्न खरोखरीच फार प्रचंड आहे. विशेष म्हणजे भारतानें आपले प्रयत्न लोकशाही मार्गावर व लोकांच्या स्वयंस्फूर्त सहकार्यावर आधारलेले आहेत. भारताचे पुढारी जबरदस्ती व जुलूम ह्यांच्या अगदीं विरुद्ध आहेत. म्हणून भारतासारख्या मोठ्या बिगर-कम्युनिस्ट देशाला यश येणें फार महत्त्वाचें आहे. नैसर्गिक साधनसंपत्ति आणि आर्थिक विकास ह्या दोन्हीं दृष्टींनीं पाहिलें तर दक्षिण आशिआ, मध्यपूर्व आणि आफ्रिका ह्या भूभागांतील सर्वांत शक्तिमान् देश भारतच आहे. लष्करी दृष्टीनें पाहतां ह्या भागाच्या केंद्रस्थानीं तो आहे. लोकशाही सामर्थ्य आणि स्थैर्य भारतांत एकवटलेलें आहे. पण त्याच्या एका बाजूला ज्वालाग्राही मध्यपूर्व आणि दुसऱ्या बाजूला अस्थिर दक्षिण आशिआ आहे. भारतांत व कम्युनिस्ट चीनमध्यें लोकांचें जीवनमान उंचावण्याचे जे प्रयत्न होत आहेत त्यांच्याकडे आशिआंतील लोकांचें बारीक लक्ष आहे. भारतामधील स्वेच्छेवर आधारलेल्या प्रयत्नांना यश लाभत आहे कां चीनमधील जुलूमजबरदस्तीच्या प्रयत्नांना अधिक यश येत आहे, इकडे त्यांचें लक्ष आहे. चीनला रशिआची मोठ्या प्रमाणावर मदत होत आहे. ह्या दोन देशांतील निरनिराळ्या दिशांनीं चाललेल्या प्रयत्नांना काय फळें येतात ह्याची तुलना होणें अपरिहार्य आहे. भारतामधील प्रयत्न यशस्वी होण्याच्या मार्गांत अडचणी आहेत ही गोष्ट खरी आहे. पण अमेरिकेनें योग्य त्या प्रमाणांत मदत दिल्यास त्यांचा परिहार करतां येणें शक्य आहे. ह्या दृष्टीनें भारत हें अमेरिकेचें एक आशास्थानच आहे.

सध्यां रशिआनें अमेरिकेला आर्थिक मदतीच्या बाबतींतहि एक प्रकारचें आव्हान दिलेलें आहे. ह्या आव्हानाचें क्षेत्र सर्व जगभर पसरलेलें आहे. तेव्हां भारताला जरूर ती आर्थिक मदत देण्याच्या परीक्षेंत अमेरिका उतरली तर रशिआच्या आव्हानाला उत्तर देण्याच्या कामीं यशाचा पाया घातला जाईल.

---

## दक्षिण भारतांतील लोखंडाची निर्यात

इटालीच्या पोलादाच्या धंद्याचे प्रतिनिधी लवकरच भारतांत येणार आहेत. दक्षिण भारतामधील लोखंडाच्या मातीची इटलीच्या पोलादाच्या कारखान्यांना निर्यात करण्याच्या शक्यतेसंबंधी ते भारत सरकारशीं व स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनशीं वाटाघाटी करणार आहेत. म्हैसूर राज्यांतील बेल्लारी–होसपेट भागांतील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्याची शक्यता ते तपासून पाहणार आहेत. ह्या भागांतील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यांत आला तर दरसाल ५० लाख टन अशुद्ध लोखंड उपलब्ध होऊं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. इटलींतील पोलादाच्या कारखान्यांना दक्षिण भारतामधील अशुद्ध लोखंडाचा पुरवठा करण्यासाठीं म्हैसूर राज्याच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांची सुधारणा करावी लागणार आहे. कारण हींच बंदरें इटलींतील बंदरांना जवळ आहेत. कारवार, मंगलोर आणि मालपे हीं तीन बंदरें ह्या दृष्टीनें सोयीचीं आहेत. ह्यांपैकीं एकाद्या बंदराचें मोठ्या बंदरांत रूपांतर करण्यांत आलें आणि बेल्लारी–होसपेट भागांतील लोखंडाच्या खाणी चालू झाल्या तर म्हैसूर राज्याची आर्थिक स्थिति चांगली भरभराटूं लागेल. अर्थात् ह्याचा इष्ट परिणाम दक्षिण भारताच्या अर्थव्यवस्थेवरहि होईल. दक्षिण भारतांत भारी उद्योगधंदे बिहार–बंगालच्या मानानें कमी आहेत. अशा प्रकारच्या धंद्यांची वाढ करण्याची दाक्षिणात्यांची मागणी आहे. त्या दृष्टीनें ह्या नव्या, संभाव्य घटनेला महत्त्वाचें मानलें पाहिजे.

---

**विद्यापीठांच्या रजिस्ट्रार्सचा दौरा**—अमेरिकेंतील विद्यापीठांचा कारभार व संघटना ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं बनारस, बडोदा, कलकत्ता व आंध्र विद्यापीठांच्या रजिस्ट्रार्सना दौऱ्यावर पाठविण्यांत आलें आहे. भारतामधील विद्यापीठांची कारभारविषयक कार्यक्षमता वाढविण्याच्या हेतूनें भारत सरकारनें दौऱ्याची योजना केली आहे. दौरा तीन महिने मुदतीचा आहे.

**सिमेंटची परदेशांतून आयात**—१९५८ च्या पहिल्या तिमाहींत भारतांत परदेशाहून ४२,००० टन सिमेंट आयात करण्यांत आलें, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. त्यापुढील काळासाठीं सिमेंटच्या आयातीचे करार अद्याप कोणत्याहि देशाशीं करण्यांत आलेले नाहींत, अशीहि माहिती देण्यांत आली.

## महाराष्ट्राच्या आर्थिक विकासास हातभार

### महाराष्ट्र बँकेच्या वार्षिक सभेंत श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

" अहवालाचे वर्षी आपले राष्ट्रीय विकासयोजनांवरील खर्चांत बरीच वाढ झाली. पण आवश्यक तें द्रव्यबळ उपलब्ध न झाल्यानें देशाचे अर्थव्यवस्थेवर फार ताण पडला. उत्पादनांत अपेक्षित वाढ झाली आणि आयातहि बरीच झाली. तथापि आवश्यक द्रव्यबळ उपलब्ध न झाल्यानें किंमतींचें प्रमाण वाढतें राहिलें. परंतु परिणामकारक उपाययोजनेमुळें या प्रवृत्तीस नंतरच्या काळांत बराच पायबंद बसला. १९५७–५८ चे अंदाजपत्रकांतील कर, कर्जावरील व्याजाचे महागडे दर व बँकांनीं द्यावयाच्या कर्जावरील नियंत्रणें यामुळें खाजगी विभागांतील खर्च कमी झाला. सरकारी विभागांतील खर्च मात्र वाढत राहिला, तरी तो मूळचे अंदाजापेक्षा कमी झाला. परिणामतः वर्षअखेरीस वाढत्या किंमतीस आळा बसला. तथापि राहणीचे खर्चाचें मान वाढतेंच राहिलें आणि चलनफुगवट्याचा धोका सारखा भेडसावीत राहिला. मध्यमवर्गाला यामुळें चांगलीच झळ लागली.

" नाणेबाजारांत पैशाचा उपलब्ध पुरवठा मागणीचे मानानें अपुरा पडला व त्यामुळें सरकार, बँका व इतर कर्जदार यांमध्यें पैसा मिळविण्यासाठीं उघड उघड स्पर्धा सुरू झाली. सरकारी विभागासाठीं पैसा मिळविण्याची सरकारची उत्सुकता समजण्यासारखी असली, तरी त्या बाबतींत त्यांनीं व्याजाचे दर वाढवून बँकांशीं उघड उघड स्पर्धा करणें सयुक्तिक आहे किंवा काय याबद्दल मला अचंबा वाटतो. सरकारनें या वर्षी निरनिराळ्या बचतयोजनांवरील व्याजाचे दरांत वाढ केली. लवकरच सरकार क्युमुलेटिव्ह ठेवीच्या स्वरूपांत लहान लहान ठेवी घेण्यास सुरुवात करणार आहे. सरकारचा हा निर्णय चिंता उत्पन्न करणारा आहे. या योजनेची झळ मुख्यतः लहान बँका व थ्रिफ्ट सोसायट्या यांना लागणार आहे.

" १९५८–५९ सालचे अंदाजपत्रकावरून सरकारी व्यवस्थेखालील उद्योगधंद्यांतील खर्चांत येत्या वर्षांत वाढ होणार असल्याचें दिसून येतें; पण नाणेबाजारांतील चणचण व परराष्ट्रीय हुंडणावळीची दुर्लभता यामुळें खाजगी विभागांतील उद्योगधंद्यांतील खर्चांत मात्र घट होणार असें वाटतें. आंतरराष्ट्रीय मंदीमुळें आपल्या परराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे हें खरें; पण अंतर्गत मागणी, उत्पन्न व रोजगार यांमध्यें घट होण्याचें भय बाळगण्याचें कारण नाहीं, असा दिलासा आपल्या पंतप्रधानांनीं दिला आहे.

" एकंदर विचार करतां, वाढत्या किंमती व किंमतीची घसरगुंडी हीं दोन्हीं टोकें टाळून आर्थिक स्थैर्य कायम टिकविण्यासाठीं यापुढें कळकळीनें प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. हें शक्य झालें, तर देशाचे आर्थिक उन्नतीविषयीं चिंता करण्याचें कारण राहणार नाहीं. या बाबतींत खर्च कमी करून व बचत वाढवून सरकारचे प्रयत्नांस हातभार लावणें, हें सर्व नागरिकांचें कर्तव्य आहे. उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करणें हें केव्हांहि धोक्याचेंच होय; आणि हें व्यक्तीचे बाबतींत जितकें खरें आहे तितकेंच राष्ट्राचे अगर सरकारचे बाबतींतहि आहे. या सूत्रांतील सत्याची प्रतीति मागील वर्षीचे अनुभवानें आली आहे. या अनुभवापासून मिळालेला बोध दृष्टीआड केला जाणार नाहीं अशी मी आशा करितों. यासंबंधांत बँकांनाहि महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे आणि ती पार पाडण्यांत त्या कसूर करणार नाहींत अशी आशा आहे.

" महाराष्ट्रांतील उद्योन्मुख उद्योगधंदेवाल्यांना आर्थिक साहाय्य व बँकिंगच्या सवलती देऊन त्यांस मदत करणें व अशा प्रकारें प्रांताच्या आर्थिक विकासाचे कार्यास हातभार लावण्याचें निश्चित ध्येय समोर ठेवून आपल्या बँकेची १९३५ सालीं स्थापना करण्यांत आली, हें आपणांस विदितच आहे. राज्य-पुनर्रचनेंत विदर्भ व मराठवाडा हे मराठी भाषिक विभाग मुंबई राज्यांतील मराठी भाषिक विभागाशीं संलग्न करण्यांत आले. बेळगांव व कारवारमधील मराठी भाषिक विभाग मात्र वेगळे ठेवण्यांत आले, या घटनेचा आम्हांस खेद होतो. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठीं तांतडीनें उपाययोजना करण्याची आवश्यकता सरकारला जाणवूं लागली आहे व निरनिराळ्या जिल्ह्यांतून उद्योगधंद्यांचें जाळें निर्माण करण्याचा कच्चा आराखडाहि तयार करण्यांत आला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. राष्ट्रीय नियोजन मंडळानें सर्व राज्य सरकारांना शेतीविषयक विकासयोजना व लहान उद्योगधंद्यांचे विकासावर अधिक भर देण्याबद्दल सूचना दिल्या आहेत ही सुद्धां आनंदाची गोष्ट आहे. कारण महाराष्ट्रांत शेती व लहान उद्योगधंदे हेच प्रधान व्यवसाय असल्यामुळें त्यांना यापुढें सरकारकडून रास्त मदतीची अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

" महाराष्ट्राची आर्थिक घडी आतां द्रुत गतीनें बदलत आहे व त्यास अधिक चांगल्या जीवनमानाची अपेक्षा करण्याचे दिवस लवकरच येतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. पण हें जें स्थित्यंतर घडून यावयाचें, त्यासाठीं त्यागाची व कष्टांची आवश्यकता आहे. आपल्या बँकेनें आजवर महाराष्ट्रांतील गरजू उद्योगधंदेवाल्यांना आर्थिक साहाय्य देऊन उपयुक्त कामगिरी केली आहे आणि महाराष्ट्रांतील जनता व सार्वजनिक संस्था यांचेकडून अशीच संधि व आश्रय मिळाल्यास पुढेंहि ती असेंच कार्य करील असें मी आश्वासन देऊं इच्छितों. महाराष्ट्रांतील जनता आमची ही अपेक्षा पुरी करील असा मला विश्वास आहे. त्यामुळें जनतेकडील शिलकी पैसा ठेवींच्या रूपानें एकत्रित करून त्याचा उत्पादक कार्याकडे विनियोग करणें तिला शक्य होईल.

"महाराष्ट्राच्या आर्थिक विकासांत आपली बँक आपली कामगिरी बजावण्यांत कसूर करणार नाहीं. पण चांगल्या प्रकारें चालविल्या जाणाऱ्या, स्थानिक परिस्थितीची व लोकांच्या गरजांची चांगली माहिती असणाऱ्या आणि आपले प्रदेशाचे आर्थिक विकासास हातभार लावणाऱ्या प्रादेशिक बँकांचे कार्याची योग्य ती दखल संबंधी अधिकारी वर्गाकडून घेतली जावी या माझ्या मागणीची मी दर वर्षी पुनरुक्ति करीत आहें, करावी लागत आहे. पण आतांपर्यंत तरी तिचेकडे दुर्लक्ष केलें जात आहे. योजनाबद्ध विकास योग्य तऱ्हेनें घडवून आणण्यासाठीं उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण करणें आणि स्थानिक जनतेनें अशा योजनांत उत्साहानें पुढाकार घेणें आवश्यक असल्याची भाषा सरकारी प्रवक्त्यांकडून नेहमीं ऐकूं येते. पण हें घडून येण्यासाठीं आवश्यक असलेली उपाययोजना मात्र अंमलांत आणली जात नाहीं.

" गेल्या दहा वर्षांत कांहीं मोठ्या बँकांतूनच ठेवी एकत्रित होत असलेल्या दिसून येतात. या प्रवृत्तीस आळा घालण्याचे आणि देशांत भक्कम पायावर आधारलेली व समाजवादी समाजरचनेचे आपलें अंगीकृत ध्येयास अनुसरून देशाच्या आर्थिक गरजा पूर्ण करणारी अशी बँकिंग व्यवस्था निर्माण करण्याचे दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें वेळींच योग्य ती उपाययोजना कार्यवाहींत आणावी अशी तिला विनंती करणें या ठिकाणीं अस्थानीं होणार नाहीं."

### "तुमचें स्थान कोणतें" ला बक्षिस

श्री. श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ," ह्यांच्या "तुमचें स्थान कोणतें" ह्या नव्या पुस्तकाला महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेनें (डे. व्ह. ट्रा. सोसायटीनें) ४० रुपयांचें बक्षिस दिलें आहे.


## The Bank of Maharashtra Ltd., Poona 2.

Applications are invited for the following posts in the Bank.

(i) Assistant Manager.

(ii) 'A' & 'B' grade officers.

Pay scales:—(i) Assistant Manager: Rs. 750-50-900-75-1200.

The post does not carry any dearness allowance.

(ii) Grade 'A': Rs. 500-35-710-40-750.

Grade 'B': Rs. 300-25-400 EB 30-550.

Dearness allowance according to usual scales prevailing in the Bank from time to time.

*Qualifications*:—(i) For Assistant Manager: A master's degree in Arts or Commerce, of a recognised Indian University or equivalent thereof. At least 10 years experience in responsible posts in a Commercial Bank. Must have held independent charge and must be able to control staff. Age not less than 40 and not more than 50 on the date of application. Good personality and demeanour.

(ii) For 'A' & 'B' grade officers: A degree in Arts or Commerce with second class marks, of a recognised Indian University or equivalent thereof. At least ten years Banking experience in responsible posts, Good personality and manners.

Persons holding certificates of Indian Institute of Bankers or Institute of Bankers, London, in addition to above will be given preference. Higher start in the grade may be given to applicants with exceptional qualifications.

Applicants must be fully conversant with Marathi. Must be able to read and write Marathi fluently. Applications to be made on prescribed forms to be obtained from the Bank on payment of Re. 1/-. Last date of Application:—7th April, 1958. Appointments will be on probation of six months in the first instance. Applicants will have to come to Poona for interview or interviews at their own cost. Canvassing directly or indirectly, will be considered as a disqualification. Applications be forwarded to The Manager at Head Office, Poona 2.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

## वीरचा पाणीपुरवठा : एक विचार

( लेखक :—एक जुना माहीतगार )

### जुनी माहिती

भोरजवळ भाटघर येथील पहिल्या बंधाऱ्याच्या बांधकामास सन १८८४ मध्यें सुरुवात होऊन सन १८९६ मध्यें तें पुरें झालें. त्या अवधींत वीर येथील निरा नदीवरील धरणाचे व निरा नदीच्या डावेकडील कॅनॉलचे कामास सुरुवात होऊन अंदाजें सन १८९६ सालींच पाटांत पाणी सोडण्यास सुरुवात झाली. त्यानंतर अंदाजे सन १९०० पासून मुंबई इलाख्यांतील–विशेषतः महाराष्ट्रांतील–नद्यांच्या पाटबंधाऱ्यांच्या संशोधनास सुरुवात होऊन सन १९१० सालीं तें संशोधन पुरें झाले; आणि गोदावरी, प्रवरा या नद्यांचीं कामें हातांत घेतलीं गेलीं. तशीच निरा राईट बँक कॅनॉलच्या कामाला सन १९१२ मध्यें सुरुवात होऊन सन १९२४ मध्यें त्या पाटांत पाणी सोडलें गेलें व त्यावर उसाची लागण सुरू झाली. त्यायोगें पहिल्यानें साखरवाडीचा साखर कारखाना व नंतर अकलूज येथील आणि त्यानंतर बृहन् महाराष्ट्र असे साखर कारखाने निघाले; व त्यामुळें पाण्याची जास्त गरज भासूं लागली. परंतु हा भाग दुष्काळी आणि रुक्ष असल्यानें हा कॅनॉल प्रोटेक्टिव्ह म्हणून हातीं घेऊन त्याची पाहणी सन १९१२ च्या सुमारास सुरू झाली; व हें निरा राईट बँक कॅनॉलचें पाणी विजापूर जिल्ह्यांतील इंडी तालुका भिजवील इतकी पाहणी केली गेली व त्याप्रमाणें पाण्याचा पुरवठा पाहिजे म्हणून निरा नदीस भोरच्या पश्चिमेस नाटंबी गांवाजवळ धरण धरणें, भाटघर धरण वाढवणें व निरा नदीस मिळणाऱ्या गुंजवणी नदीस नसरापुरजवळील मोहरी गांवाजवळ धरण बांधणें, अशी पाहणी झाली. त्यास अनुसरून कृष्णा नदीस वाईच्या पश्चिमेस धोम गांवाजवळ धरण धरून भोर व वाई यांमध्यें असलेल्या अंबाड खिंड डोंगरास बोगदा खणून त्यावाटें कृष्णेचें पाणी भोरच्या बाजूस नेरें-पालें-जवळील ओढ्यास सोडणें, कारण तो ओढा भोरजवळ निरा नदीस मिळतो. त्यामुळें निरा राईट व लेफ्ट अशा दोन्ही पाटांना जरूर लागणारें पाणी मिळूं शकणारें होतें व त्याचा वीर धरणांत जास्त सांठा होणें वाजवी म्हणून पहिल्यानें तें धरण आहे यापेक्षां जास्त वीस चाळीस व साठ फूट वाढविण्याचीहि पण पाहणी झाली. अखेर भाटघरचेंच धरण वाढवून, सांठा करून बांधकाम करणेस सुरुवात झाली, व त्याच वेळीं निरा राईट बँक कॅनॉलच्या कामास सुरुवात झाली.

जोंपर्यंत हे कॅनॉल प्रोटेक्टिव्ह म्हणून होते तोंपर्यंत आठमाही पिकास पुरें होणारें पाणी मिळे; परंतु तेच कॅनॉल पुढें प्रॉडक्टिव्ह झाल्यानें उसाचे लागणीस सुरुवात झाली. साखरेचे अनेक कारखाने निघाले हें ठीक. ज्यावेळीं प्रोटेक्टिव्ह म्हणून होते, त्यावेळीं निरा राईट बँक कॅनॉलचे दोन-तीन मोठे फाटे काढले—एक अकलूजकडे जाणारा, दुसरा भालवणी ते पंढरपूरकडे जाणारा व तिसरा फाटा पंढरपूरकडे म्हसवड कॅनॉलचे फाट्यास मिळून पुढें जाणारा. या तिसऱ्या फाट्याखालीं, पाटापासून भीमा नदीपर्यंतचा उत्तर भाग, दक्षिणेस माण नदीपर्यंत मंगळवेढा भाग अशी एकूण अंदाजें दोन लाख एकर जमीन भिजणारी आहे. पण फाटा नं. १ खालीं ऊंस–लागण होऊन साखर कारखाने निघाले आहेत. नं. २ खालीं भालवणी भागांस रब्बी हंगामांत कांहीं भागांस पाणी दिलें जातें. परंतु नंबर दोन व तीन पर्यंतचा अगदीं कोरडाच आहे, मग इंडी तालुक्यास पाणी जाणें बाजूस राहिलें. पण सध्यां फाटा नंबर दोन व तीनपर्यंत कॅनॉल सर्वतोपरीं तयार असून पाणी जाण्याइतकें पुरेसें पाणी नसल्यानें तो भाग अगदीं कोरडाच पडून आहे. म्हणजे सध्यां तो कॅनॉल तयार करण्यास झालेला खर्च व्यर्थ व फुकटच गेला आहे.

### संभाव्य धोका

हल्लीं वीर येथील धरण वाढविणेचें काम सुरू झालें आहे, आणि तें साठ फूट वाढविणार आहेत असें कळतें. त्यायोगें धरणांत सांठणाऱ्या पाण्याची लेव्हल ( बॅक वॉटर ) भाटघर धरणापर्यंत येईल असें वाटतें. त्यामुळें पावसाळ्यांत पूर, महापूर आले म्हणजे तेथें असलेलें वीज उत्पन्न करणारें यंत्रघर पाण्यांत बुडून वीज बंद पडेल असें वाटतें. ही गोष्ट धरण पुरें झालेवर होईल हें खरें, पण नुकताच सन १९५६ सालीं महापूर आला त्यावेळीं हल्लीं असलेल्या धरणाच्या उंचीनेंसुद्धां महापुरानें तें यंत्रघर पाण्याखालीं बुडून आठ दिवस वीजपुरवठा बंद होता असें ऐकिवांत आहे; आणि जर हें धरण आतां आहे या उंचीपेक्षा साठ फूट वाढवलें तर तो वीजपुरवठा कायमचाच बंद होईल असें वाटतें. हें धरण नुसतें साठ फूटच काय, पण आहे ह्या उंचीपेक्षा कितीहि म्हणजे चाळीस फूट अगर वीस फूट जरी वाढवलें तरीहि वीजपुरवठा बंद होणार आहे.

### एक सूचना

आतां वीर धरण न वाढवतां वाईजवळील धोम गांवाजवळ धरण धरून अंबाड खिंड डोंगरांतून बोगद्यांतून पाणी नेरें–पालें गांवाजवळ आणून भोरजवळील रामबागच्या ओढ्यास सोडल्यास जास्त पाण्याचा पुरवठा होणें शक्य आहे असें वाटतें व त्या बोगद्यामुळें कोयनेच्या वीज-पुरवठ्याखालोखाल येथेंहि भरपूर वीजपुरवठा होईल आणि मग भाटघरच्या वीजपुरवठ्याची आवश्यकता वाटणार नाहीं. शिवाय, धोमच्या या धरणामुळें वाई शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटेल, त्याचप्रमाणें भोरलाहि हल्लीं पाणी पाहिजे तेवढें मिळत नाहीं, तेंहि प्रश्न सुटेल. या रामबाग ओढ्यास निळकंठ गांवाजवळ धरण धरून तें पाणी ग्रॅव्हिटेशननें भोरजवळील शंकर टेकडीवर चढविल्यास त्यामुळें हेड मिळून पाणी भोर शहरास लागेल तितकें मिळेल. त्यामुळें भोरची वस्ती वाढून अनेक कारखाने निघण्यास वाव होईल. पूर्वीं संस्थान असतांना श्रीमंत राजेसाहेबांनीं अशीच योजना आंखल्याचें ऐकिवांत आहे व त्यानें बारीकसा कॅनाल उत्रवली गांवाच्या बाजूनें काढून खानापूर-उत्रवली–वडगांव वगैरे गांवांतील जमिनीस पाणी देऊन साखर कारखाना काढण्याचेंहि श्रीमंतांचे मनांत होतें असें म्हणतात. तरी यांत काय तथ्य आहे याची चौकशी सरकारनें करावी असें वाटतें–सरकारजवळ तज्ज्ञ मुरब्बी इंजिनिअर पुष्कळ आहेत, आणि त्यांच्या सल्ल्यामुसार सरकारनें वीर धरण साठ फूट वाढविण्या-पूर्वीं पूर्णतः त्याची पाहणी करूनच तें ठरविलें असलें पाहिजे. त्याचबरोबर साठ फूट वाढीचें बॅकवाटर भाटघर धरणापर्यंत येतें हेंहि ध्यानांत आलें असेलच. महापुराचें पाण्यानें नदी-कांठच्या गांवांतून पाणी शिरण्याचा संभव आहे याकडेहि लक्ष दिलें असेलच. परंतु माझ्या अल्प समजुतीनें तसें दिलें गेलें नसावें असें वाटतें. हें महापुराचें पाणी भोर गांवांत शिरून श्रीमंतांचे वाड्यास पाण्याचा वेढा पडेलसें वाटतें, व शिवाय त्यायोगें भोलवडें, सांगवी, येवली, संगमनेर, इंग व इंगवाडी गांवेंहि या पाण्यांत जाणार आहेत असें वाटतें–

हें सर्व दूर करणें असेल तर तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार कृष्णा नदीवरील धोम गांवाजवळील धरणाची पाहणी करून तें काम हातीं घ्यावें; व कॅनॉलचे पाण्याला हेड मिळेल एवढेंच म्हणजे वीस फूट उंच वीरचें धरण वाढवावें असें वाटतें.

धोमचें धरण झाल्यास भोर ते वाई रस्ता होईल व त्यामुळें पुणें ते महाबळेश्वर रस्ता जवळचा होऊं शकणार आहे अशी समजूत आहे. तरी सरकारनें तज्ज्ञांची समिति नेमून वीरचे धरणाचा विचार करावा व त्याचप्रमाणें धोमच्या धरणाचाहि विचार व्हावा, अशी एका जुन्या माहितगाराची विनंती आहे.

---

## मेहेकर गहाणी बँकेचा रौप्यमहोत्सव

### प्रा. द. गो. कर्वे ह्यांचें भाषण

ता. १८ मार्च रोजीं सायंकाळीं विदर्भाच्या बुलढाणा जिल्ह्यांतील मेहेकर गांवीं मेहेकर जमीन गहाणी बँकेचा रौप्यमहोत्सव प्रो. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें साजरा झाला.

आपल्या अध्यक्षीय भाषणांत, गेलीं २५ वर्षें अव्याहतपणें व यशस्वी रीत्या कार्य करणाऱ्या या बँकेच्या संचालकांचे व बँकेचे अगदीं स्थापनेपासून असलेले अध्यक्ष श्री. व्यं. के. ऊर्फ दादासाहेब सोमण यांचें अभिनंदन करून प्रा. कर्वे म्हणाले, "आजपर्यंत सहकारी बँका व जमीन गहाणी बँका यामार्फत देण्यांत येणाऱ्या कर्जाची पद्धति इतःपर राहणार नाहीं. आतां उत्पादनवाढीचें एकमेव उद्दिष्ट डोळयासमोर ठेवूनच कर्जे आणि इतर मदत दिली जाईल.

लोकशाहीच्या या काळांत समतेचें तत्त्व रुळविण्यासाठी पंचायत व सहकारी संस्था या पायाभूत आहेत. त्यांच्या प्रगमनशीलतेवरच वरच्या संस्थांचा विकास घडून येईल.

आजच्या जगाच्या भांडवली बाजारांत कर्जे देण्याची पद्धति बदलली आहे. ज्या योजनेसाठी कर्ज किंवा मदत द्यावयाची त्यांतून होणारें उत्पादन व भांडवलाची गुंतवणूक यांची परस्पर पूरकता लक्षांत घेणें हेंच एक महत्त्वाचें तत्त्व राहणार आहे.

आजपर्यंत जमीन गहाणी बँका शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कर्जे फेडण्यासाठी त्यांना कर्जे देत असत; पण तो काळ व ती प्रथा आज झपाट्यानें बदलणार आहे. सहकारी बँकांना नवीन दिशा आखावी लागेल.

ग्रामीण कर्जयोजनेंत देखील नियोजन मंडळाला अशाच प्रकारची शिफारस करण्यांत आली आहे व म्हणूनच जुन्या कर्जाच्या परतफेडीसाठी इतःपर सरकारकडून कुणालाहि मदत मिळणार नाहीं. शेतकऱ्यांवर असलेलीं जुनीं कर्जे फेडण्यासाठी कायद्याच्या तरतुदी करण्याची राज्य सरकारें आवश्यक वाटल्यास योजना आंखतील, परंतु राष्ट्राजवळ ग्रामीण क्षेत्रांतील किंवा कुठलींहि कर्जे फेडण्यास पैसा नाहीं, जो पैसा आहे तो सर्व विकासकार्यासाठीच वापरावयाचा आहे.

सहकारी चळवळ उत्तरोत्तर गतिमान करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रांत सहकारितेचें तत्त्व गोंवलें पाहिजे. दहा-पंधरा सहकारी साखर कारखाने किंवा पायलट प्रोजेक्टस काढून हें कार्य साधणार नाहीं, तर वऱ्हाडसारख्या या क्षेत्रांत कच्च्या मालापासून पक्का माल तयार करण्याचे उद्योग, खरेदी-विक्री, या गोष्टीसुद्धां सहकारी तत्त्वांवरच झाल्या पाहिजेत; तरच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत येईल.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं ३७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. २,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. ३ टक्के | |
| ३ ,, ,, | ,, | ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, | ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, | ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, | २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, | २½ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठी क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**दिल्लींत अफूचें वांटप**—अफूच्या उपयोगावर संपूर्णपणें बंदी घालण्याचा निर्णय दिल्लीच्या अधिकाऱ्यांनीं घेतला आहे. ही बंदी १९५९ च्या एप्रिलपासून अंमलांत येईल. पुढील महिन्यापासून प्राथमिक तयारी म्हणून अफूचें वांटप करण्यांत येणार आहे. त्यामुळें १९५८–५९ सालीं सरकारला ३ लाख रुपयांच्या उत्पन्नाला मुकावें लागेल.

**भारताचा इतिहास**—सामान्य लोकांच्या उपयोगासाठीं सरकारतर्फे भारताच्या इतिहासाचें एक पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. ह्या इतिहासासाठीं ५,००० रुपयांचें बक्षिस जाहीर करण्यांत आलेलें होतें. आतांपर्यंत १५ लेखकांनीं आपलीं हस्तलिखितें सादर केलीं आहेत. तीन प्रख्यात इतिहासकारांचें मंडळ त्यांची तपासणी करणार आहे.

**अणुशक्तीवरील वीजकेंद्रें**—सोव्हिएट रशिआंत येत्या कांहीं वर्षांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारीं आणखी कद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. ब्रिटनच्या काल्डरहॉल वीजकेंद्रापेक्षा त्यांचें वीजनिर्मितीचें सामर्थ्य ४ ते ६ पटींनीं अधिक असेल. तीं ४ लाख ते ६ लाख किलोवॅट वीज निर्माण करणारीं असतील.

**इंडोनेशिअन सरकारला मदत**—इंडोनेशिआंतील सरकारला बंडखोरांविरुद्ध रशिआकडून मदत मिळणार असल्याची वार्ता आहे. वैमानिकांचें शिक्षण व जेटचीं विमानें अशा स्वरूपाची ही मदत असेल. सध्यां इजिप्तमध्यें इंडोनेशिआच्या लष्करी वैमानिकांना रशिआकडून शिक्षण देण्यांत येत आहे.

**देणगी कराविरुद्ध तक्रार**—मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांत बसविण्यांत आलेल्या देणगी कराविरुद्ध आणि वारसा करामधील दुरुस्तीविरुद्ध बिहार चेंबर ऑफ कॉमर्सनें तक्रार केली आहे. त्यामुळें भांडवलाच्या संचयाला अडथळा होईल व तें अनुत्पादक मार्गानें जाईल, असें चेंबरचें मत आहे.

**प्रवासी विमानांची संख्या**—जगांतील सर्व देशांत मिळून प्रवासी नेण्याआणण्याचीं कामें करणारीं ६,००० विमानें आहेत. ह्याशिवाय विमानवहातूक कंपन्यांनीं आणखी १,५०० विमानांच्या मागण्या कारखान्यांकडे नोंदल्या आहेत. भारतांतील विमानकंपन्या ९९ विमानांचा उपयोग करीत आहेत.

**रशिआ पुढें कां?**—रशिआंतील निवडणुका पहाण्यासाठीं गेलेल्या अमेरिकन निरीक्षकांबरोबर बोलतांना मि. क्रुश्चेव्ह म्हणाले कीं, रशिआंत बुद्धिमान् लोकांची निवड अधिक चांगली होते. म्हणून रशिआ शास्त्रीय विषयांत पुढें आहे. त्याचा अर्थ अमेरिकन लोकांत बुद्धिमत्ता कमी आहे असा नाहीं.


श्री. वा. काळे ह्यांच्या कौटुंबिक पुस्तकांचे गुजराती अनुवाद.

'सस्तु साहित्य एटले उंचामां उंचुं साहित्य'

सदाचारने पगले अथवा शिष्टाचार

'पुढे पाऊल' ह्या दुसऱ्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत अनुवाद, विक्रीस तयार.

पृ. सं. १३७] ★ [किंमत रु. १.२५

सुखी जीवननी पगदंडी

'कण आणि क्षण' च्या प्रा. ओझाकृत अनुवादाची दुसरी आवृत्ति.

पृ. सं. १६८] ★ [किंमत रु. १.५०

सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, अहमदाबाद

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

(शिड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन २५३४०८)

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... | ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... | ... | रु. ५८,००,००० |

उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.